म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

# …सुधा.

…चा आणि उपदेशपर

…संग्रह,

…र्थ रचिला.

---

सन १८६७ च्या २५ व्या आ० नोंदला आहे.

---

मुंबईत

[redacted] ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

ग्रंथालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

# भक्तिसुधा.

हा ईश्वरप्रार्थनेचा आणि उपदेशपर

पद्यांचा संग्रह,

## जनहितार्थ रचिला.

---

सन १८६७ च्या २५ व्या आ० नोंदला आहे.

---

मुंबईंत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत बावुमोरेश्वर हळवे यांनीं

छापून प्रसिद्ध केला.

---

शके १७९४, इ० स० १८७२.

---

किंमत ९ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणें सन १८

# प्रस्तावना.

जनांमध्यें सद्धर्माची वृद्धि व्हावी एतदर्थ हा लहानसा कवितासंग्रह मी तयार केला आहे. यामध्यें कोठें कोठें परमेश्वराची आराधना केली आहे, आणि कोठें नीतिपर उपदेश केला आहे. याच्या योगानें दुरभिमान जाऊन परमेश्वराविषयींचा जो खरा प्रेमा, जी खरी भक्ति, आणि सकल बांधवांविषयीं जी खरी प्रीति यांची जनामध्यें प्रवृत्ति होईल, तर माझे अल्प श्रम सफल होतील. या अनंत कोटि गोलांचा नायक सर्वशक्तिमान्, मंगलरूपी, श्रीपरमेश्वर, यानें मला बुद्धि देऊन निजसेवेस, आणि माझ्या सकल बंधुजनांच्या सेवेस, प्रवृत्त केलें आहे. तरी बंधुजनांस माझी विनयपूर्वक एवढीच प्रार्थना आहे कीं, या कवितेंतील दोषांकडे लक्ष्य न देऊन मूळउद्देश ध्यानांत ठेवावा.

यांत अनेक वृत्तांचे श्लोक, आर्या, साक्या, निरनिराळ्या लोकप्रिय चालींचीं पदें, अभंग दोनचरणी व चारचरणी, भुपाळी व आरत्या यांचा संग्रह केला आहे. महाराणीचे ज्येष्ठपुत्र महाज्वरांतून मुक्त झाल्यावर ब्रिटिश राज्यांत ठिकठिकाणीं तारीख २७ माहे फेब्रुआरि सन १८७२ मंगळवार रोजीं आभारपूर्वक ईश्वरप्रार्थना झाल्या, त्या प्रसंगीं प्रार्थनासमाजांत गाइलेलीं गीतेंही यांत प्रसिद्ध केलीं आहेत. पद्यांत कोठें परमेश्वराचें पद, चरण, पाय, हस्त, कंठीं प्रेमाची माळ इत्यादि अनेक साकार पदार्थांस लागणा-

ऱ्यां शब्दांचा उपयोग केला आहे; तो केवळ अलंकारार्थ केला आहे, असें सांगणें अवश्य आहे. कोठें-कोठें नेहमीं उपयोगांत न येणाऱ्या शब्दांचीही पद्यांत योजना केली आहे; त्यांच्या स्पष्टीकरणार्थ ग्रंथाच्या शेवटीं एक लहानसा कोश रचिला आहे.

इहलोकीं सन्मार्गानें वर्तून परमार्थ साधावा, ह्मणजे अमृतपदाची प्राप्ति करून घ्यावी; सर्व जातींच्या लोकांशीं समप्रीतीनें आचरण करावें; दुरभिमान सोडून सत्याचा स्वीकार करावा; दीनदुबळ्यांवर दया करून त्यांच्याशीं नम्रतेनें वागावें; त्यांस होईल तेवढी द्रव्यद्वारा किंवा शरीरद्वारा मदत करावी; ते इहलोकीं निकृष्टावस्थेंत आहेत, ह्मणून त्यांचा धिक्कार करूं नये; ढोंगाचा त्याग करून खऱ्या भक्तीनें परमेश्वराची सेवा करावी; शुद्ध चित्तानें त्या विश्वाधाराचें चिंतन करावें; पापविमोचनार्थ त्या जगद्वंद्य मायबापाचें स्मरण करून अनुतप्त व्हावें; बाह्योपचारांच्या, ह्मणजे कर्ममार्गाच्या खटाटोपींत पडून त्या अनादि परमेश्वराचें विस्मरण होऊं देऊं नये; जगदीशाचेठायीं सद्भाव धरून चित्तशांतीची प्राप्ति करून घ्यावी; आणि चिरायुसुखाचे विभागी व्हावें;—हें आपलें सकल कर्त्तव्य मनांत नेहमीं वागवावें, हा माझा अभिप्राय आहे, असें पुढील पद्यांवरून ध्यानांत येईल. हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत ज्या मित्रांनीं मला हरप्रकारें साह्य केलें त्यांचा मी मोठा आभारी आहें.

भाद्रपद वद्य ९ }
शके १७९४. }

**ग्रंथकर्त्ता.**

४८७ नं.
मराठी ग्रंथ सं[illegible]लय
नं.

# भक्तिसुधा.

## भाग १.

### श्लोक,

भुजंगप्रयात.

नमो देवराया नमो ज्ञानसिन्धो
नमो दीननाथा नमो दीनबन्धो ।
नमो निर्मला निर्गुणा निर्विकारा
नमः सर्वशक्ते नमो हे उदारा ॥ १ ॥

नमो विश्वकर्त्या नमो विश्वपाळा
नमो मायबापा नृपाळा कृपाळा ।
नमः सौख्यकंदा नमो विश्वभूपा
नमः सच्चिदानन्द शांतिस्वरूपा ॥ २ ॥

स्मरावें प्रभो मीं तुला नित्यभावें
हरे पाप, घेतां तुझीं गोड नांवें ।

जरी राहिना देह साधुस्वभावें
तरी भूमिलोकीं कशाला जगावें॥३॥

तुझें गीतगातां जळे पापराशी
तुझी प्रार्थना सर्व संदेहनाशी ।
तुझ्या भक्तिची शक्ति केवीं वदूं मी
कवी संत योगी निवाले सुनामीं ॥४॥

दया अंगिं माझ्या करो नित्य वास
असो सौख्यशांती सदा या जिवास।
वदो मंगला सर्वदा माझि वाणी
करीं प्रार्थना मी प्रभो दीनवाणी ॥५॥

निराधार जे दीन मी बंधु पाहें
जयां सौख्य नोहे, जयां शक्ति नोहे ।
तयां साह्य व्हाया मती द्यावि मातें
अति प्रीतिनें साह्य होईन त्यांतें॥६॥

इंद्रवज्रा.

त्वां दीधल्यावीण हि शक्ति राया
कोठून येईल कशी नरा या ।
तूं शक्तिदाता सकळां जिवांचा
कारुण्यसिंधू भयहारि साचा ॥७॥

भुजंगप्रयात.

तुला एकटयालाच आम्हीं नमावें
तुझे पायिं देवा त्रिकाळीं रमावें ।
तुझे सारिखा अन्य नाहींच थोर
तुझे पाय ध्यातां चुके सर्व घोर ॥८॥

प्रभो प्रीतिनें प्रार्थिल्या तूज थोरा
सवें अंत येतो महा सर्व घोरा ।
न कांहीं घडे रे कृपेवीण तूझ्या
तरी प्रार्थु आम्ही न कोणासि दूज्या ९

इंद्रवज्रा.

कोणी नसे बा मज तूजवीण
तूं त्यागितां ही तनु होय क्षीण ।

तेवेळिं कांहीं मजला सुचेना
होई मती मंद मला गमेना ॥ १० ॥

भुजंगप्रयात.

घडे भक्ति ना ज्या मनींरे विकारें
वसावें कसें त्यास्थळीं निर्विकारें ।
पदीं देवरायाचिये दीन झाला
प्रभू सद्गुरू नेइ मोक्षा तयाला ॥ ११ ॥

इंद्रवज्रा.

नामामृताची मज गोडि लागो
संतोषवृत्ती हृदयांत वागो ।
मन्मानसीं हे प्रभु भक्ति जागो
सद्वाक्य जिव्हा न कदापि त्यागो १२

भुजगप्रयात.

भवाच्या सुखा मानवा भूलतोशी
सुखी मानुनीयां मनीं डोलतोशी ।
परी नष्ट होई तुला हें कळों दे
प्रभूसाधनीं चित्त तूझें वळों दे ॥ १३ ॥

असे तूज ठावें कसा काळ जाई
किती तो पळे रे कशी त्याचि घाई।
न तो संपला तोंवरी मुक्ति साधीं
न ती साधितां तो पुढें तूज बाधी॥ १४

नसे आदि ज्या वा नसे ज्या हि अंत
जया मंगला वानिती साधु संत।
वसे सौख्य शांती जयाचे सुनामीं।
तया अर्पि भावें नमस्कार हा मी १५

मनींच्या विकारांशि जो पूर्ण जाणे
कृपेचीं प्रदर्शी असंख्य प्रमाणें।
जगद्वंद्य ऐसा असे स्वामि एक
तया अर्पि भावें नमस्कार तोक १६

इंद्रवज्रा.

आसन्न नांदे परि दूर राहे
जो सूक्ष्म वा जो अति थोर आहे।

बाह्यस्थ अंतस्थ हि सर्वगामी.
त्या अर्पि भावें प्रणिपात हा मी ॥१७

आहे प्रभो रे तुज ठाउकें हें
केलें किती ह्या जनिं पाप देहें ।
न्यावें परि त्वां मज सौख्यधामीं
अर्पीत आहें प्रणिपात हा मी ॥१८॥

तो पितृ बंधू भगिनीहि माय
सांडूनि मातें क्षणिं एक जाय ।
अंतीं पडेना कुणि एक कामीं
अर्पी तरी बा प्रणिपात हा मी ॥१९॥

भुजंगप्रयात.

उन्हाळीं जशी ती वना आग लागे
महा वायु येतां जळे फार वेगें ।
तसा हा शरीरासि जाळी कुकाम
दहा होइ तें कर्णिं येतांचि नाम ॥२०॥

इंद्रवज्रा.

भंगे भ्रम ब्रह्मउपासनेनें
राहे सदा निर्मल चित्त तेणें ।
प्रेमें करीं नित्य उपासना मी
मातें मिळे सौख्यद-शांतिनामीं ॥ २१

वसंततिलका.

व्यासादि साधु कथिती चरिता जयाच्या
गाऊं गुणां कितिक पामर मी तयाच्या ।
ठेवीं सदा विमलभाव तयाच ठायीं
त्यावीण कोण मज मुक्ति कदा न देई ॥ २२ ॥

श्लोक,

कामदावृत्त.

विश्वनिर्मित्या विश्वपालका,
भेट तूझिया देइं बालका ।

काम लोभ हे गांजिती अरी,
भेट देउनी संकटा हरीं ॥ १ ॥
दीनवत्सला तूझियाविणें,
व्यर्थ व्यर्थ हें व्यर्थ हें जिणें ।
सत्यरूप तूं हे परात्परा,
शुद्ध शान्त तूं यातनाहरा ॥ २ ॥
असाशि जो सदा व्यापुनी जगा,
त्या तुला विभो केविं गाउं गा।
ज्ञानखाणि तूं हे जगत्पती,
प्रार्थितों तुला मूढ मी अती ॥ ३ ॥
विषयसौख्य हें याचितों न मी,
चरणिं दीन मी तूझिये नमीं ।
ह्मणुनि शीघ्र बा देइं दर्शना,
तदनु होतसे शांति या मना ॥४॥
दीन मी तुझें दीन लेंकरूं
तूझियाविणें काय बा करूं ।

नाणिं मी कधीं कांहिं अंतरीं
मानसीं प्रभो तूजला धरीं ॥ ५ ॥

तुजविणें जगीं सर्व संपदा
नित्य-सुख मला देति ना कदा ।
सुवर्ण रौप्य हीं जाति बा क्षणीं
घडिमधीं सख्या होतसें ऋणी॥६॥

सौख्य अंतरीं वाटतें मला
चित्त ठेविल्या पादिं निर्मला ।
मार्ग दाविं तो मुक्तिसाधना
याचिं ना दुज्या ईश्वरा धना ॥ ७ ॥

श्लोक,

शार्दूलविक्रीडित छंद.

प्रारंभीं करुनी प्रणाम शिरसा,
राजाधिराजा तुला
आह्मी बंधु मिळोनि उत्सव करूं,
सप्रेम हे निर्मला ।

व्हावें साह्य अशा सुवेळिं ह्मणुनी
आरंभिली प्रार्थना
यावें होउनियां प्रसन्न सकळां
द्यावें प्रभो दर्शना ॥ १ ॥

रंगे मन्मन नित्य, हे प्रभुवरा
तूझ्याच पादांवुजीं
गुंगोनी भ्रमरापरी रसभरें कैव-
ल्यदात्या पुजी ।
आह्मां देउनियां सुबुद्धि सकळां
ज्ञानामृता पाजलें
तेणें नाम तुझें विभो निशिदिनीं
भक्तांमुखीं गाजलें ॥ २ ॥

जो तूं मोक्षपदासि नेसि अवघ्यां
रक्षूनियां सज्जनां
त्या त्वां बा प्रतिपालना अमुचिया
यावें जगज्जीवना ।

रं०-३१०५
४८०



सद्भावें मन हें तुलाचि विनवी
नामा तुझ्या गाउनी
आहों हीं प्रभु लेंकरें मलिन तूं
यावें तरी धांवुनी ॥ ३ ॥

आनंदें तुजला प्रभो गुणनिधे
वंदोनि मांडीं स्तवा
आहें मी मतिमंद, दे विमल धी
तेणें तरें मी भवा ।
प्रेमें नाम तुझें मुखींहि वदल्या
विघ्नें लया पावती
भक्तांच्या हृदयीं तुझ्या सुभजनें
आनंद ना मावती ॥ ४ ॥

सत्कृत्यें प्रिय जाणुनीच सुमनें
भावें तुला अर्पिलीं
तेणें पूर्णपणें मनींचि अवघी इच्छा
प्रभो तर्पिली ।

प्रेमाची बहुरम्य माळ करुनी
कंठीं तुझ्या घातली ।
तेणें ही अति उत्तमा भवजलीं
काया सुखा पावली ॥ ५ ॥

मूढें म्यां जरि सोडुनी तुज विभो
अन्यत्र ती वाहिली ।
कैंची या भवसागरीं मग मला
विश्रांति रे राहिली ।
या साठीं अति आदरें तुज दिली
ही रम्य पुष्पांजली
जी कोणा जगदीश्वरा तुजविणें
अन्या नसे साजली ॥ ६ ॥

प्रातःकाळिं उठोनि मी करितसें
प्रेमें तुझ्या भक्तिला
देशी सौख्य अपार पार न दिसे
देवा तुझ्या शक्तिला ।

सायंकाळिं नमीं स्मरोनि भगवन्
आभार लक्षावधी
रात्रींही घडल्या न भक्ति, सखया
ना शांत चित्तोदधी ॥ ७ ॥

ऐसा मी करितों त्रिकाळ भजना
देवा तुला वंदुनी
लावीं अल्प सुमार्गिं काळ, ममता-
पाशास त्या छेदुनी ।
काढीं यास्तव पापबुद्धि अवघी
माझ्या मनीं जी वसे
भक्तीवांचुनि कांहिं तारक असें
मातें कुठें ना दिसे ॥ ८ ॥

रामें त्या दशकंधरा वधियलें
बोले महा वाल्मिकी
नेतां ती कपटें सुशील अबला,
सीता सती जानकी ।

तैसें दुर्मतिला प्रताप करुनी
सद्बुद्धिनें मर्दिलें
नेतां रे मम भक्तिला निजसवें
लोभें तुझ्या छेदिलें ॥ ९ ॥

या मूढा मजला अशाश्वत सुखें
कां हीं प्रभो भावलीं
ऐसा कां भ्रमलों सुबुद्धि अवघी
कां ही लया पावली ।
झालों मी हतभाग्य केंवि न कळे
हे सौख्यकंदा मला
कां हा या भुवनीं निरर्थक असा
प्राणी प्रभो जन्मला ॥ १० ॥
भेटे ना मजला दयानिधि सखा
काष्ठीं जळीं काननीं
राहोनी हृदयीं सदैव न दिसे
माझ्या जरी या मनीं ।

कौशल्या जगिं पाहुनी मन जरी
पादाब्जिं त्या ना वळे
होई भेट कशी, कसें अघ हरे
मातें कदा ना कळे ॥ ११ ॥

ज्या ध्यातां भजतां कदापि न वळे
वृत्ती कुमार्गाप्रती
जो रक्षी अवघें दयार्द्र जग तो
भेटो मला भूपती ।
चातुर्यें अपुल्या सुखें भरित ही
केली जयानें धरा
ज्याच्या पार नसे अतर्क्य महिम्या
त्या मी नमीं ईश्वरा ॥ १२ ॥

श्लोक, मालिनी छंद.

करुनि नमन तूतें,
नम्रभावें कृपाळा
शरण तुजचि आलों
दर्शना दे दयाळा ।

मज तव चरणीं ने,
जाउं अन्यत्र कोठें
त्यजुनि तुज कसें मी
साहुं हें पाप मोठें ॥ १ ॥
तव पदकमलीं म्यां
नित्य वस्ती करावी
तव गुणभजनाची
गोडि जीवीं धरावी ।
मनन करुनि तूझें
लोभमोहा हरावें
हृदय विनयपुष्पें
सर्वदा म्यां भरावें ॥ २ ॥

श्लोक, पृथ्वी छंद. [ केकावली. ]

प्रभो पतितपावना
कवण तो मला तारितो
जिवा करुनि शांत या,
सकळही अघा हारितो ।

नसे तुजविणें दुजा;
तरि विनंति हे आयका
विनम्र करुनी मना
धरिं पदा जगन्नायका ॥ १ ॥

अगा प्रभुवरा तुला
शरण मी सदा येतसें
करूनि भजना तुझ्या,
हृदय हें तुला देतसें ।
असे दुरितयुक्त तें,
तरि तुझ्या प्रसादें करीं
विशुद्ध अति नम्र मी;
तरि मला स्वहस्तें धरीं ॥२॥

अनादि परमेश्वरा
तव पदीं सदा लेंकरूं
रमे; न जरि मी रमूं,
तरि जगीं कसें मी करूं ।

कसा तुजविणें विभो
भवजलामधीं मी तरूं
कसा कुमदमत्सरा-
दिक रिपूंशि मी संहरूं ॥ ३ ॥

अनंतसुखदायका
तुझि कृपा जनां लाधली
तुवांच अमुच्या सुखा
अमित साधनें दीधलीं ।
ह्मणूनि शिशु हा तुझा
सकलसौख्य भोगीतसे
तुझ्याच भजनामृता
अनिश दास सेवीतसे ॥ ४ ॥

तुझें स्मरण मांडितों
मग मनीं उभा राहशी
गमे रमुनि मंदिरीं
बहुत तेथ तूं शोभशी ।

सख्या प्रिय तुझ्याविणें
कधिं न शांत मी मन्मनीं
अनंत जन फीरती
सुखद भेटिसाठीं वनीं ॥ ५ ॥

वनीं न फिरुनी तृषा
सुभजनाचि मीं भागवीं
सदोदित परी तुला
विमल या हृदीं वागवीं ।
सुपुष्पसुविलेपनीं
दिसशि ना कदाही धनें
अमूर्त तुज ईश्वरा
रमविण्या न हीं साधनें ॥६॥

स्वरूपिं रममाण तूं,
तुजसवें रमें मी सख्या
अचिंत्य बघुं शक्ति ना
विभु दुज्या तुझे सारिख्या ।

अगाध तुझि शक्ति बा
    सकल ती न आह्मां कळे
बघून रचना जगीं
    तुजकडे सुवृत्ती वळे ॥ ७ ॥

समुद्र शशि सूर्य हे
    विमल कीर्ति गाती तुझी
तशी अनिश गावि म्यां
    प्रभु मला न इच्छा दुजी ।
तुझ्याच करुणेविना
    अखिल सृष्टि चाले न ही
तुवांच जनसौख्यदा
    अति विशाळ केली मही ॥ ८ ॥
जशी मधुर मक्षिका
    मधु निवांत ती प्राशिते
हरूनि अपुली क्षुधा
    सुमन लेश ना नाशिते ।

तुझ्या सुपदपाद्मिंची
  तशि पिईन भक्तीसुधा
करीन परिपूर्ण तैं
  मनिंचि आस माझ्या, बुधा॥९॥

शिखरिणी छंद.

तुझ्या देवा नामें
  अमित सुख होई मज सदा
ह्मणोनी ध्यानीं मी
  विमल धरितों नित्य सुपदा ।
धरीं आत्मारामा
  हृदयिं, तरि तूं भेटशि मला
मिळाल्याशी भेटी
  सुखद शिशुला लाभचि भला १
प्रभो त्वत्पादांची
  कधिं न मजला विस्मृति घडो
सदा ठेवीं माथा
  तव पदिं तिथें वृत्तिहि जडो ।

घडे ना चित्तीं ज्या
  क्षणभर तुझी भक्ति सदया
कशी ये तैं शांती
  दुरितमलसंगें समुदया ॥ २ ॥

मदानें मोहानें
  मदनशरतापें तनु जळे
धरावें सन्मार्गा
  प्रभु तरि मला मुक्तिहि मिळे ।
न जाती पापें तत्
  जनित अवघें दुःख विलया
जरी ना होई मद्
  हृदय भजनें बा विमल या ॥३॥
जनांच्या कल्याणा
  प्रभु मज दिसे युक्ति बरवी
पडे काया कामीं
  जरि न अभिमानासि मिरवीं

जरी ये ना गर्वा
  मलिन समुळीं अंत, सुखदा
तरी सत्कृत्यें ह्या
  विमल घडती हातिं न कदा ॥४॥

असत्कर्मालागीं
  सुजनित कशा काय झिजवूं
असन्मार्गस्थांना
  अविहित कुकर्मांनिं रिझवूं ।
प्रभो तूझे ठायीं
  सुमन रत होवो अनिश हें
कसें तें संतोषे
  हृद मम तुझे पादविरहें ॥ ५ ॥
बळें कां पापाग्नी
  भडकवुनि घालूं मधिं उडी
त्यजूनी सन्मार्गा
  तनु हि शिणवूं मी घडिघडी ।

जया वंदीयेल्या
 मनिं सकल संताप शमती
तया तूझेठायीं
 सतत वुध सप्राण रमती ॥ ६ ॥

प्रभो सारी माझी
 सुमति दडपे बा अघबळें
सुसत्यासत्याचा
 मग मज खरा भेद न कळे ।
अशा भ्रांतीमाजी
 कधिं न पडुं दे व्यर्थ शिशुला
करूं काई सांगें
 प्रभु न धरिं मी अन्य गुरुला ७

गुरू तूं, बंधू तूं,
 मम जनक तूं, आप्त अवघे
मदें, त्वत्पादाब्जीं
 दुरित मन ना धांव झणि घे ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

कशी होई माझी
  स्थिति मज कळे ना भयहरा.
तुझ्या लोभें होऊ
  मन विमल, शांती–सुखकरा ८

जगद्वंद्या गातों,
  गुण सकल तूझे क्षणभरी
ह्मणोनी वाचेला,
  विमल करिं, मत्तापहि हरीं।
करावें ध्याना म्यां
  जरि न दिससी चर्मनयनीं
विभो अंतःस्थानीं,
  हृदयिं वससी वा त्रिभुवनीं॥९

व्रतें पूजा अर्चा,
  नियम हवनाचे, प्रभुवरा
न कांहीं लक्षीं मीं,
  करिं मधुर गाना अघहरा।

तुझ्या संसर्गानें
प्रभु मन वळे नित्य भजना
मिळे शांती भावें,
स्मरण करितां भाविकजनां॥१०

न पावें मोक्षा मी
मम तनु जळीं स्नान करितां
हृदाच्या मालिन्या
धुवुनी कशि टाकील सरिता।
कसें तीर्थें जाईं
हृदयिं जडलेलें अघ महा
अनाद्यंता तुझ्या
विमल पदिं जाण्या पथ न हा११

---

# भाग २.

## आर्या.

संकट मजवरि पडतां
धांवत ये शीघ्र त्यासि हाराया।
ताराया मज दीना
कोण तुझ्याविण समर्थ हा राया १
हे राया जगताच्या !
विनवित तुजला तुझाचि हा दास।
द्यावें दर्शन यातें
हृदयीं धरितों तुझ्या सुपादास २
जेविं निशा ती हरपे
पावुनियां दिव्य भानुतेजातें।
दुर्बुद्धि ही तशी प्रभु
स्तवितां तुजला स्वमानसीं जाते ३
लोभा न मिळे थारा
मानस होतें तुझ्या स्तवें शुद्ध।

मत्सर बंधुजनाचा
न करी मन्मति न होय ती क्रुद्ध ॥४॥
संचरतां मद्धृदयीं
स्थानचि कोठें मिळे न मोहाला।
मंगल गान तुझें प्रभु
भासे तें सत्य त्यासि विष-भेला ५
मन तव पदिं रत होतां
देई आश्रय कदा न कामाला ।
सत्वर मर्दुनि त्यातें
धावें प्रेमें तुझ्या सुधामाला ॥६॥
सद्गुरु सज्जन ह्मणती
ज्या तो माझा असे सहाकारी ।
तो अति संकटसमयीं
साह्या मातें कधीं न नाकारी ७
मी त्या सद्गुरुलागीं
प्रेमलभक्तीसि अर्पितों भावें ।

सौख्यद मोक्षपदातें
पावाया मधुर आठवीं नांवें ॥८॥
मी होउनि विषयीं रत
शाश्वत सुख दे तयासि विसरुं कसा।
आठविं नाम तयाचें
ध्याया हृदयांत भेटि उत्सुकसा ९
भीमातिरीं तयाच्या
भेटीलागीं कदा न मी जाईं ।
हृदयीं वसुनि दिसेना
तरि मज भेटे प्रभू तिथें काई१०
त्यजुनी सन्मार्गातें
कैसा मंत्रें प्रभूस आळविशी ।
ढोंगें असार करुनी
भावाविण कैशि मुक्ति मेळविशी ११
शतकोटी जप जपशी
भक्तिविणें परि कसा घडे स्वार्थ।

भावाविण मन चंचल
नोहे स्थिर, बा उपाय हे व्यर्थ १२
सोडुनि दुर्मद अवघा
ईशपदातें सदैव जोडावें ।
जाउनि शरण विभूला
या भवपाशांस शीघ्र तोडावें १३
न गमे मज मूढाला
केवीं गावें तुझ्या विभो महिम्या।
तव लीलादर्शक ही
आनंदें बहु विलोकिली महिम्यां १४
गगना भेदिति ऐसे
नग केले त्वां विशाळ या भुवनीं।
नाना औषधतरुंच्या
असती सादर सदैव जे अवनीं १५
निर्मल नीर नद्यांचें
वाहे झुळझुळ तया नगांवरि तें ।

जाणों मार्गीं जातां
  मंगल गायन तुझें प्रभो करितें १६
भजनीं निमग्न असतां
  जसि सरिता जाय सिंधु-सदनाला
तैसें सन्मार्गें म्यां
व्हावें पदिं रत तुझ्या जगत्पाला १७
निर्मियला तेजोमय
  दिनकर सुखकर असा तुवां भानू।
जो जीवन विश्वाचें
  वात्सल्य तुझें प्रभो किती वानूं १८
मृदुशीतल प्रकाशें
  तोषवि रजनीस तो जनां इंदू ।
जाणों तुझ्या कृपेनें
  नयनीं सेवित असों सुधाबिंदू १९
आद्यंत ज्या नसे तो
पाहुनि जलधि प्रभो स्तवीं तुजला।

ओहटि भरती लाटा
वात्सल्यें रे तुझ्याच येति जला २०
कोमल पल्लवयुक्तहि
नाना तरु शोभताति पुष्पांनीं ।
तच्छाया गंधि फळें
सेवुनि जग हें प्रभो तुला वानी २१
ऐसें हे भगवंता
चातुर्य तुझें अतर्क्य, अति थोर ।
लीला विविध तुझ्या ह्या
आठवितां भय टळे चुके घोर २२
यास्तव लीलागानीं
देउनि रुचि मज सदैव रक्षावें ।
प्रभु त्वच्चरणांवांचुनि
अन्य कदा कांहिं मीं न लक्षावें २३
विश्वाचें कारण तूं
हे प्रभु मी तुज कदा नुपेक्षावें ।

पीडित बंधुजनांतें
साह्य यथाशक्ति करुनि रक्षावें २४
विहित सुखें जीं भुवनीं
असती तीं म्यां यथेच्छ सेवावीं।
परि वृत्ति प्रभुभजनीं
नित्य सुखास्तव सदैव ठेवावी २५

---

## भाग ३.

दिंड्या.

नमन करुनी तुज प्रार्थि देवराया
देइं दर्शन बा दीन तूं नरा या।
कोण तुजविण मज अन्य पाळिताहे
कृपादृष्टीनें पूर्ण मला पाहें ॥ १ ॥

प्रभो तुजला मी भक्तिबळें साधीं
नसे त्याविण मज अन्य रे उपाधी।
तरी दासा या भेट दे अनंता
पाव पाव सख्या पूर्णकृपावंता॥ २

धांव घेतों मी शीघ्र प्रभूराया
चरणकमला तव, मानसीं धराया।
करिशि मजवरि अत्यंत प्रीति माया
नसे शक्ती मज पूर्ण ती वदाया॥ ३

येइं हृदयीं मम येइं मायबापा
हरीं माझ्या तूं हरीं सकळ पापा।
छेदिं कामादिक षडरि हेतु तापा
गांजलों मी बहु धांव शांतिरूपा ४

अहर्निशि हे प्रभु घोष कीर्तनाचा
करो आनंदें दीन हीच वाचा।
असत्कार्यीं कल नसो मानसाचा
संग व्हावा परि संतसज्जनांचा ५

विश्वपाला हा विनवि दीन पायां
न हें जाऊं दे जन्म अखिल वांयां ।
झटो क्षणभर तरि नाशवंत काया
दयादृष्टीनें स्वजनहित कराया ॥६॥

मागणें हें तुजपाशिं जगत्पाळा
कोटि अपराधां विसरुनी दयाळा ।
द्यावि उत्तम गति दीन बालकाला
अर्पि सेवक सप्रेम गीतमाला ॥७

नामघोषें मी प्रार्थि तूजलागीं
दुःखडोहांतुनि काढिं मला वेगीं ।
विसरलों रे तुज केविं मी अभागी
धांव संचरलें पाप सर्वअंगीं ॥८॥

जया सज्जन बोलती सृष्टिराजा
तया त्यागुनि मीं सुता बंधु भाजा ।
निराधारी तुज विनविं दास तूझा
नको पाहूं बा अंत विभो माझा ॥९

येइं धांवुनियां दीनबंधु येईं
येउनीयां मज भेट तुझी देईं।
अर्पिलेलें मम हृदयसुमन घेईं
चरणिं तूझ्या या सेवकासि नेईं १०

भस्म लावावें कासया कपाळा
हस्त गोमूखीं कशा कंठिं माळा।
नको बा हे उपचार तुझ्या बाळा
भक्ति साधन बा आमुचें कृपाळा ११

घोर दुःखाचा आलिया प्रसंग
सुबुद्धीचा बा होउं नये भंग।
सज्जनांचा परि नित्य घडो संग
झटो सत्कार्यीं हें सदैव अंग १२

नेइं मजला तव सुखद मंदिराशी
हेंचि मागें मी प्रभो तूजपाशीं।
देह माझा जरि असे पापराशी
मुक्ति मजला तरि देइं कृपाराशी १३

जगन्नाथा हे विभो सर्वसाक्षी
सदा कारुण्यें दीन दास रक्षीं ।
तुझ्या पायांविण अन्य मी न लक्षीं
ह्मणुनि मजलागीं ना कदा उपेक्षीं १४

वेष्टुनी जो या सर्व जगा राहे
सृष्टिभारातें अखिल सदा वाहे ।
अंतरींचें गुज पूर्ण जाणताहे
तोचि चिन्मय मज तेथ दीसताहे १५

---

## भाग ४.

साक्या.

काया वाचा मन हीं चरणीं
म्यां तुझिये ठेवीलीं ।
त्यागुनि अवघ्या ऐहिक वांछा
भक्तिसुधा सेवीली ॥ १ ॥

नाहीं नाहीं आप्त इतर मज
प्रभुराया तुजवीणें ।
करिशी माझा त्याग जरी तूं
व्यर्थ तरी हें जीणें ॥ २ ॥

मिळल्या घडिला करितों देवा
सार्थक या देहाचें ।
मंगलधामा आळविं तुजला
नामा गाउनि वाचे ॥ ३ ॥

धांव धांव बा भक्तवत्सला
त्रैलोक्याच्या नाथा ।
भवभयभंगचि निश्चित होइल
ठेवियल्या पदिं माथा ॥ ४ ॥

करुणार्णव तूं असशी देवा
त्वद्गुण मी किति वानूं ।
कोण असा रे थोर असे कीं
त्या तुजसम मी मानूं ॥ ५ ।

स्मरणीं तुझिये शांति जिवा या
होई हे जगजेठी ।
आस मनींची आहे ही कीं
व्हावी त्वत्पदभेटी ॥ ६ ॥

दीनदयाळा स्वेच्छेनें त्वां
उद्धरिले जन कोटी ।
तेवीं ने मज मोक्षा, घालुनि
मम अपराधां पोटीं ॥ ७ ॥

नीर नदीचें तृषितालागीं
वाटे सौख्यद जेवीं ।
भक्तिरसामृत या तव शिशुतें
देवा लागे तेवीं ॥ ८ ॥

आठविं देवा तुजला क्षणभर,
विसरुनियां संसारा ।
नाठवितां मी दुःखें साहूं,
केवीं विश्वाधारा ॥ ९ ॥

जीवन अमुचें इहलोकीं या,
शाश्वत सखया नाहीं ।
जाणुनि ऐसें निजभक्तीच्या,
सुमना त्वत्पदिं वाहीं ॥ १० ॥

निशिदिनिं शरणागत मी प्रभु तव,
आठवितों पदपद्मा ।
देउनि तरि मज प्रेमालिंगन,
न्यावें झणि सुखसद्मा ॥ ११ ॥

---

## भाग ९.

पद १.

विघ्नविभंजन हो,
आठवा विघ्नविभंजन हो ॥ ध्रु० ॥
त्याविण नेणों अन्य कदापि,
मोक्षा साधन हो ॥ १ ॥ आठवा०

हा भवसागर पार पडूं या,
तेणें सज्जन हो ॥ २ ॥ आठवा०
भवभय वारुनि तारिल आह्मां,
पापविनाशन हो॥ ३ ॥ आठवा०
या मुक्तीतें मिळवूं करुनी,
प्रेमळ वंदन हो ॥ ४ ॥ आठवा०

पद २.

पूर्णदयाघन हो,
स्तवुं या पूर्णदयाघन हो ॥ ध्रु० ॥
आहे अवघ्या ब्रह्मांडाचें,
तोची जीवन हो ॥ १ ॥ स्तवुं या०
भाव अचल वा भक्ती मुक्ती,
हे सुखस्यंदन हो ॥ २ ॥ स्तवुं या०
प्रभु तो लाभे, करितां त्याचें,
मानसपूजन हो ॥ ३ ॥ स्तवुं०

गंध पुष्प हीं असार सारीं,
सांगत मन्मन हो ॥४॥ स्तवुं या०

पद ३.

संकट सर्व निवार,
प्रभुजी ध्यातों; दुःख निवार ॥ध्रु०॥
तारक पालक ह्या विश्वाचा,
असशी तूं आधार ॥ १ ॥प्रभुजी०
तव ध्यानाविण कधिं न चुके हा,
दुःखास्पद संसार ॥ २ ॥ प्रभुजी०
झिजावें म्यां करण्यासाठीं,
संतत पर-उपकार ॥ ३ ॥प्रभुजी०
मंगल नामें तव विश्वेशा,
जोडे पुण्य अपार ॥४॥ प्रभुजी०
शांति सुखातें नेशिल आह्मां,
करुनी हा भव पार ॥५॥ प्रभुजी०

पद ४.

कर माझा उद्धार,
दयाळा कर माझा उद्धार ॥ ध्रु० ॥
तव गुणमंडित होउनि ल्यावा,
म्यां तो सद्गुण हार ॥ १ ॥ दयाळा०

विसरुनि तुजला कैसा साहूं,
मस्तकिं हा अघभार ॥२॥ दयाळा०

कामादिक रिपु गांजिति मातें,
पापें मळलों फार ॥ ३ ॥ दयाळा०

द्रव्यें दारा सुत अवघीं हीं,
असती सर्व असार ॥४॥ दयाळा०

यास्तव तुजला स्तवितों देवा,
विनवुनि वारंवार ॥ ५ ॥ दयाळा०

पद ५.

धरिं तूझे प्रभु पाय,
निशिंदिनिं धरिं तूझे प्रभु पाय॥ध्रु०

अंतरतां तूं आत्मारामा,
सार्थक तनुचें काय ॥ १ ॥ निशिंदि०
वांछित शाश्वत सौख्यासाठीं,
नेणें अन्य उपाय ॥ २ ॥ निशिं०
विषयासक्त न कधिं म्यां व्हावें,
तेणें होय अपाय ॥ ३ ॥ निशिं०
जाया सुत धन अवघ्यांचा या,
क्षणभंगुर व्यवसाय ॥ ४ ॥ नि०
सांडुनि जातां सकळिक मातें,
लागतसे हयहाय ॥ ५ ॥ निशिं०
जाणुनि ऐसें स्तविं तुज प्रेमें,
दास तुझा प्रभुराय ॥ ६ ॥ निशिं०

पद ६.

विसरुं नका भगवान्,
जनहो, विसरुं नका भगवान् ॥ ध्रु० ॥

सकल जगाचा चालक नायक,
पूर्ण कृपेचें स्थान ॥ १ ॥ जनहो०

न कळे त्याचा अंत कदाही,
एवढा देव महान ॥ २ ॥ जनहो०

होय न आह्मांलागिं तयाच्या,
सामर्थ्याचें मान ॥ ३ जनहो०

राव रंक त्या दीनदयाळा,
असती सर्व समान ॥ ४ ॥ जनहो०

कोण विभूविण सांगा सांगा,
करवी अमृतपान ॥ ५ ॥ जनहो०

निर्मल अर्पुनि हृदय प्रेमें,
द्या ईशा सन्मान ॥ ६ ॥ जनहो०

अनुदिन त्याच्या मंगल गाना,
न घडावा अनमान ॥ ७ ॥ जनहो०

पद ७.

नाम तुझें हें गोड,
प्रभु मज नाम तुझें हें गोड ॥ध्रु०॥
नामें तुझिया मुक्ती साधे,
होई तव पदजोड ॥१॥ प्रभु मज०
पापें जळलों, मजवरि शांती-
मेघा शीतळ सोड ॥२॥ प्रभु मज०
उगवूं दे मम हृदयीं संतत,
कोमल सद्गुणमोड ॥३॥ प्रभु मज०
जेणें तूझा विसर पडे मज,
त्या संबंधा तोड ॥४॥ प्रभु मज०
कोण दुजा तुजवांचुनि सखया,
पुरविल माझें कोड ॥५॥ प्रभु मज०

पद ८.

देव दयाळु किती,
रे अपुला देव दयाळु किती ॥ध्रु०॥

प्रेमें गुणनिधि आलिंगुनियां
मुनिजन ज्या नमिती ॥
रे ऐसा देव दयाळु किती ॥ १ ॥

नानाविध हीं सौख्यें देतो,
जेणें जन रमती
रे ऐसा देव दयाळु किती ॥ २ ॥

अऱ्हेरीना शरणागत जे,
होउनि त्या स्तविती
रे ऐसा देव दयाळु किती ॥ ३ ॥

अळवित जा त्या सुखकंदाला,
ऐशी मम विनती
रे आपुला देव दयाळु किती ॥४॥

पद ९.

ध्याहो ॥
प्रभुला संतत गाह्हो ॥
त्या सन्निध तुह्मि याहो ॥

भक्तिरसामृत प्याहो ॥
करुनी मुक्ति घ्याहो ॥
हृदय करुनी निर्मल, त्यातें,
तें प्रेमें तुह्मि द्याहो ॥ १ ॥ घ्याहो० ॥

तो तारी ॥
ब्रह्मांडा जो धारी ॥
दासांचें भय हारी ॥
अवघें संकट वारी ॥
कालत्रयिं सहकारी ॥
दीनदयाघन, अनाथनाथ,
भक्तांचा कैवारी ॥ २ ॥ तो तारी०

तो आहे ॥
अंत तयाला नोहे ॥
बाह्याभ्यंतरिं राहे ॥
भार जगाचा साहे ॥
आमुची चिंता वाहे ॥

अति ममतेनें, रक्षुनि सर्वां,
समदृष्टीनें पाहे ॥ ३ तो आहे० ॥
तो धांवे ॥
संकटिं भक्तां पावे ॥
अवघें त्यातें ठावें ॥
उद्धरतो जन नांवें ॥
घेतां साधु स्वभावें ॥
प्रार्थू ऐशा भगवंता, या
बंधुजनांनो भावें ॥ ४ तो धां० ॥

पद १०.

("अंजनिसुत हनुमंत महाविर वायुसुना हनुमंतारे" —या चालीवर.)

जगदीश्वर करुणाकर अघहर,
घोर तुझ्याविण न टळे रे ॥ ध्रु० ॥
कोठुनि आलों, कोठें जातों,
पूर्णपणें मज न कळे रे ।
त्वत्पदिं मन्मन रत हें झालें,
क्षणिक सुखातें न वळे रे ॥ १ ॥

षड्रिपुंनीं ही गांजिलि काया,
परि तव लोभें न ढळे रे ।
सत्संगति म्यां जोडिलि प्रेमें,
मन्मन आतां न मळे रे ॥ २ ॥

पापविनाशन सन्निध आहे,
पाप अखिल कां न पळे रे ।
मच्चित्तीं मी भजन करीं मग,
पापें कधिं तें न जळे रे ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

पद ११.

( त्याच चालीवर. )

भजन करा श्री जगद्गुरूचें,
जाइल जन्म वांयां रे ॥ ध्रु० ॥
सत्वर येउनि प्रेमें त्याच्या,
घाला मिठि दृढ पायां रे ।
निर्मल करुनी मन हें अपुलें,
या सन्निध प्रभुराया रे ॥ १ ॥

सत्सुख त्याच्या सन्निध लाभे,
तेथें मग कां ना या रे ।
कामशरांनीं व्यापिलि कैशी,
अमोल्य तुमची काया रे ॥ २ ॥
ज़ाळुनि कामा देइल शांति,
ऐशा ईशा ध्याया रे ।
आठवुनी त्या जयजयकारें,
मंगलरूपा गाया रे ॥ ३ ॥ भजन०

पद १२.

( त्याच चालीवर. )

विघ्नहरा सुखकरा प्रभुवरा,
ये दुर्धर षड्रिपु-कदना ॥ ध्रृ० ॥
साह्य तुझें मज नसतां केवीं,
जिंकूं मी त्या दुर्मदना ।
संतांवरि संतप्त जाहलों,
कैसा दावूं तुज वदना ॥ १ ॥

द्रव्यानें मी अंध जाह्लों,
ऐशा मज दुर्मद वहना ।
तव ध्यानाची गोडी लागो,
लागो मन हें तव भजना ॥ २ ॥
लोभा मोहा लुब्ध जाह्लों,
ल्यालों मत्सररुप वसना ।
धिक्कारुनियां बंधुजनांतें,
विषयाची धरली रसना ॥ ३ ॥
विनवित प्रेमें बालक तूझें,
मानासिं धरुनी दृढ चरणा ।
संग तुझा बा सौख्यद मातें,
ने मज अपुल्या सुखसदना ॥४॥

पद १३.

( सारंग राग. )

जगदुद्धारा करिं भावें प्रेमलगाना।
सांडुनि वांछा ऐहिक मी त्या धन-
मान ॥ ध्रु० ॥

निर्मियली त्वां नरतनु ही अद्भुत
 लीला ।
अंतर्यामीं सहवास प्रेमें केला ॥
ह्मणुनी तूझ्या भजनीं रे शिशु
 हा रमला ।
मंगलध्यानें आनंदें अनुदिन भरला
 ॥ १ ॥ जग० ॥

उपवास व्रतें तीर्थें म्यां देवा त्यजिलीं।
सद्गुणमात्रें सकल म्यां तनु सज-
 वीली ॥
ह्मणुनी तूझ्या भजना ती निशिदिनिं
 झटली ।
बांधवप्रीति पूर्णपणें हृदयीं जडली
 ॥ २ ॥ जग० ॥

संसाराचे व्यर्थ हे ममताजाळ ।
त्यागुनि साधू धुंडिती रानोमाळ ॥

परि संसारीं राहूनि प्रभु हें बाळ।
चरणीं होई रत तूझ्या वेळोवेळ
॥ ३ ॥ जग० ।

पद १४.

( "उद्धवा शांतवन करजा"—या चालीवर.)

संसारिं गुंतलों परी हें, मन लागो
प्रभु तव चरणीं ॥ ध्रु० ॥
तुजविण हे मंगलधामा, अन्य न
मजला थारा ।
प्रेमें मीं गाउनि कीर्ति, आठवितों
तव उपकारा ।
नाम तुझें मजला वाटे, अति मधुरा
अमृतधारा ॥
(चाल) किति तरि मी पापें मळलों ।
दुर्मदें किति मनिं जळलों ।
सन्मार्गापासुनि वळलों ॥

अति दुःसह माझी करणी १
संसारिं०॥
त्रैकाळीं तुजला ध्याती, संत मुनी
विनटुनि ध्यानीं ।
ध्यानाविण मार्ग तुझा तो, कधिं
न कळे या भवरानीं ।
विषयाच्या गोडीनें या, देहाची
होते हानी ॥
(चाल) काया ही जाइल वांयां ।
सांडिल मज धनसुतजाया ।
धरिं तरि मी दृढ तव पायां ।
होऊ तुज प्रिय ही सरणी २
संसारिं० ॥
सुस्थिर मी करिं मन माझें, तोडुनि-
यां भ्रांतीपाशा ।
कर जोडुनि विनवीं तूतें, ये झड-
करि भवभयनाशा ॥

ठेवियला तुजवरी भार, शिशुची
या पुरवीं आशा ॥
(चाल) भावें तुज पापनगारी ।
सकळही स्तवुं नर नारी ।
अवघ्या या पतितां तारीं ।
हो सुखकर आह्मां स्मरणीं ३
संसारिं० ॥

पद १५.

( "झूलतराधासंग"–या चालीवर. )

प्रभु तूझि ममता अनंत ॥
हे प्रभु तूझी ममता अनंत ॥ ध्रु० ॥
दीनदयाळा, हे जनपाळा,
आह्मांसि लागे ना अंत ॥१॥ हे प्र०
विस्मृति पडतां, सेवा न घडतां,
होतसे मानसिं खंत॥२ ॥ हे प्रभु०
सेवेंत असतां, द्रव्यहि नसतां,
असुं आम्हि लक्ष्मीवंत ॥३॥ हे प्र०

अद्भुत लीला, गातां दयाळा,
शिणलेहि साधू संत ॥४॥ हे प्रभुतू०
आनंदकंदा, शाश्वतसुखदा,
संसार हाचि दुरन्त ॥५॥ हे प्रभु०
पातकनाशन, विघ्नविभंजन,
तारिं अम्हां भगवंत ॥६॥ हे प्रभु०

पद १६.

( त्याच चालीवर. )

संतत पडुं दे प्रकाश ॥
दयेचा मजवरी पडुं दे प्रकाश ॥ध्रु.॥
मनविषयीं कां गुंतुनि गेलें,
कां त्या धरी भवपाश ॥ १ ॥ दये०
प्रभु तव चरणां, त्यागुनि जातां,
निश्चित होइल नाश ॥ २ ॥ दये०
इहलोकसौख्यें, मजशि न मिळतां,
न कधीं मी होइं निराश ॥ ३ ॥ द०

अविनाशसौख्यें, तुजपाशीं भोगूं,
ऐसाचि मनिं अभिलाष ॥४॥ दये०

पद १७.

("भज भज भवजलधिमाजि" या चालीवर.)

वद वद वद वद रसने नाम मंगलाचें।
कर कर सार्थक या अतुल जीवनाचें॥
अति सुंदर तनुहि सकल।
क्षणीं एक होय विकल।
ह्मणुनी स्मरीं चरणकमल।
अनिश प्रभुवराचें॥ १ ॥ वद वद०
तोचि दीनबंधु हरिल।
प्रेमें अति जाड्य अखिल।
सद्भावें हृदय भरिल।
स्वीयसेवकाचें ॥ २ ॥ वद वद०
कोण प्रभूवीण सदय।
सत्कार्यीं देइल जय।

घोर दुःख टाळिल भय।
दीन अनाथाचें ॥ ३ ॥ वद वद०
आठविं तरी जगदीश्वर।
तोचि एक भवभयहर।
भजन अतिप्रेमल कर।
निशिदिनीं तयाचें ॥ ४ ॥ वद वद०

पद १८.

(त्याच चालीवर.)

धर धर धर विभो आपुल्या करानें।
सकल हरुनि पापें मोक्षमंदिरा नें॥
कृत्य तुझें अखिल भुवन।
देखुनि आरंभि स्तवन।
न करिं यज्ञ याग हवन।
अर्पि न बलिदानें ॥ १ ॥ धर धर०
भक्तिबळें दोष झडति।
पंचप्राण चरणिं गडति।

व्यर्थ न गळिं माळ पडति।
कधिं न धुंडिं रानें॥२॥ घर घर०
व्यर्थ गमे हेंचि जनन।
जरि न होइ पापहनन।
जरि न घडे चरण मनन।
विभो देहभानें॥३॥ घर घर०
वनिं जाउनि व्यर्थ दमति।
भावाविण योगि श्रमति।
दे मज तरि शुद्ध सुमति।
प्रार्थी विनयानें॥४॥ घर घर०

पद १९.

सुनो जी दयानिधि।
हरो चित्तकी आधि॥ध्रु०॥
भक्तीसे मन दीनदयामय।
पामे सौख्य हमारा।

ध्यानभजनको निसुदिनु करके ।
गावे गून तुमारा ॥ १ ॥ सुनो०
त्रिभुवनका तुम नाथ बिजरात ।
सुखका सब हो दाता ।
सबही तुम हो आप्त हमारा,
पिता माता भ्राता ॥ २ ॥ सुनो०
गावत नाचत पादकमलपर,
रखूं शीस दयाला ।
पालन करना दीन दासका,
तुम हो पालनवाला ॥ ३ ॥ सुनो०

पद २०.

( "माझ्या बाळावरता रोष," या चालीवर. )

शुद्ध सनातन हे भगवान् ।
दासासि पावें बा ॥ ध्रु० ॥
व्यर्थ झिजे हा इंद्रियग्राम ।
जाळी मजला निष्ठुर काम ।

नाहीं अंतरीं रे आराम ।
मंगलधाम ! धांवें बा॥ १ ॥ शुद्ध०
द्रव्य न मागें, हे गुरुराय ।
मोक्षालागीं, तो न उपाय ।
हृदयीं धरितों तूझे पाय ।
अर्पी काय, भावें बा ॥ २ ॥ शुद्ध०
पापें झालों फार उदास ।
सत्सौख्याची आहे आस ।
अन्य नसे या मनिं उल्हास ।
मोक्षपदास न्यावें बा ॥ ३ ॥ शुद्ध०

---

## भाग ६.

(अभंग चारचरणी.)

### अभंग १.

तारीं देवराया, तारीं या अनाथा ।
तुझे पायीं माथा, ठेवी दीन ॥ १ ॥

सकल जनांचा, तूंचि एक त्राता ।
तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ २ ॥
सकल सुखांचा तूंचि एक दाता ।
तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ ३ ॥
सकल पापांचा, तूंचि एक शास्ता ।
तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ ४ ॥
पापनिर्दालना, करीं शुद्ध चित्ता ।
तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ ५ ॥
पापाम्यां त्यजावें, नसे दुजी आस्था।
तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ ६ ॥
अभिलाषीं ना मीं, पराचिया वित्ता ।
तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ ७ ॥
अखिल ब्रह्मांडीं, तुझी एक सत्ता ।
तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ ८ ॥
सज्जन शिणले, गुण तुझे गातां ।
तरी पायीं माथा ठेवी दीन ॥ ९ ॥

कृपेनें करीशी, पावन पतीतां ।
तरी पायीं माथा ठेवी दीन ॥ १० ॥

अभंग २.

मंगल वाणी ही, वाचेनें वदतां ।
पुण्य हे अनंता, जोडे दासा ॥१॥
मनोमळ जाई, नामा उच्चारितां ।
पुण्य हे अनंता, जोडे दासा ॥२॥
दीन बांधवांना, संकटीं रक्षीतां ।
पुण्य हे अनंता, जोडे दासा ॥३॥
विहित सुखें हीं, संसारीं भोगीतां ।
पुण्य हे अनंता, जोडे दासा ॥ ४ ॥
भुकेल्यां तान्हेल्यां, अन्न पाणी देतां ।
पुण्य हे अनंता, जोडे दासा ॥ ५ ॥
थकल्यां भागल्यां, विश्रांती करीतां ।
पुण्य हे अनंता, जोडे दासा ॥६॥
आंधळयां पांगुळयां कटींखांदे नेतां ।
पुण्य हे अनंता, जोडे दासा ॥७॥

संकटीं शत्रूचीं संकटें हरीतां ।
पुण्य हे अनंता, जोडे दासा ॥८॥
निर्मळ सदा त्या, ठेवियेल्या चित्ता ।
पुण्य हे अनंता, जोडे दासा ॥ ९ ॥
संतपालनाची, वाहियेल्या चिंता ।
पुण्य हे अनंता, जोडे दासा ॥१०॥

अभंग ३.

नेणें कैसा आलों, कोठें तो मी जाय ।
धरीं तूझे पाय, दीनबंधू ॥ १ ॥
नेणें जन्मा आलों, कराया तें काय ।
धरीं तूझे पाय, दीनबंधू ॥ २ ॥
नेणें भक्तीवीणें, मुक्तीतें उपाय ।
धरीं तूझे पाय, दीनबंधू ॥ ३ ॥
नेणें सत्यावीणें, अन्य व्यवसाय ।
धरीं तूझे पाय, दीनबंधू ॥ ४ ॥
दुःसह घडीचा, मज अंतराय ।
धरीं तूझे पाय, दीनबंधू ॥ ५ ॥

व्हावया कृपेशीं, पात्र प्रभूराय ।
धरीं तूझे पाय, दीनबंधू ॥ ६ ॥

अभंग ४.

व्हावी मोक्षप्राप्ती, पतितपावना ।
हीच माझ्या मना, एक आस ॥ १ ॥
आस तूं मनींची, जाणशी सकळ ।
होउनी कृपाळ, पुरीव ती ॥ २ ॥
न ती पुरविशी, तरि कोठें जावें ।
काय तें करावें, अव्हेरील्या ॥ ३ ॥
अव्हेरील्या तुवां, नेणता रे बाळ ।
करी तळमळ, अंतरीं तो ॥ ४ ॥
अंतरीं न तूतें, ठेवियेलें जेणें ।
व्यर्थ त्याचें जीणें, दास ह्मणे ॥ ५ ॥

अभंग ५.

अनंत दुःखें बा, भोगूं या संसारीं ।
सोडवीं कैवारी, देवा मातें ॥ १ ॥

देवा मातें नोहे, समाधान अन्य।
तुजवीणें शून्य, सारें वाटे ॥ २ ॥
वाटे मातें सारें, देवराया गोड।
होई जरी जोड, पादाब्जांची ॥ ३ ॥
पादाब्ज मी नमीं, भावें हे अनंता।
अंत पाहूं आतां, नको माझा ॥ ४ ॥
नको माझा त्याग, अन्यथा तूं करूं।
जाऊं मी लेकरूं, कोणापाशीं ॥ ५ ॥

अभग ६.

देवा जरी दास, आठवी पदास।
न कधीं उदास, होय तरी ॥ १ ॥
लागतां स्वच्छंद, होतसे आनंद।
विषयाचे बंद, तुटती तें ॥ २ ॥
दुर्जनाचा संग, करी सत्यभंग।
दुष्ट वा तरंग, येती मनीं ॥ ३ ॥
ह्मणोनी सुखदा, संतसंग सदा।
द्यावा; मोक्षपदा जायीं तेणें ॥ ४ ॥

पुरेल अपेक्षा, नेशी जरी मोक्षा ।
माझी न उपेक्षा करावी त्वां ॥ ५ ॥

अभंग ७.

कृपेचें माहेर, शांतीचा सागर ।
तया नमस्कार, असो माझा ॥ १ ॥
बोल भगवंता, कोण्या कृपावंता ।
आठवूं मी आतां, भक्तिभावें ॥२॥
बाळा जैशी माता, तैसा आह्मां त्राता ।
पाळिता पोषिता, सर्वां लागीं ॥३॥
कोण देई सुख, हारुनियां दुःख ।
पाळाया प्रमूख, कोण असे ॥ ४ ॥
देवा तूजवीण, आह्मी बा मळीण ।
सर्वकाळ क्षीण, निःसंशय ॥ ५ ॥

अभंग ८.

तूंचि एक देवा, कर्ता करविता ।
देता देवविता, जगत्पाळा ॥ १ ॥

असतां कोमल, प्रभो तूं सदय।
पाषाणहृदय, व्हावें कां म्यां ॥२॥
नेणे जो त्वद्भक्ति, नेणे जनप्रीति।
त्वत्पद त्याप्रति, लाभे कैचें॥ ३ ॥
राहिं माझे सदा, प्रभुवरा ध्यानीं।
येऊं ना दे मनीं, येर कांहीं ॥ ४ ॥
येर सर्व कांहीं, जगीं या मी पाहें।
तेंचि मागें राहे, मेल्यावरी ॥ ५ ॥

अभंग ९.

अनंत काळींच्या, अनाथाच्या नाथा।
तुझे पायीं माथा, नित्य नमी ॥ १ ॥
दीन तुझा बाळ, आहे निराधार।
घाली सर्व भार, तूझेवरी ॥ २ ॥
तूझेवरी माझा, प्रेमा जिवलगा।
न करीं वियोगा; दुःख वाटे ॥ ३ ॥
दुःखा वियोगाच्या, कैसा असे पार।
जीवनाचें सार, न मिळाल्या ॥४॥

जीवनाचें सार, प्रभो तूंच एक ।
करितां विवेक, दासां लाभे ॥ ५ ॥

अभंग १०

अमंगळ वाणी, वदाया जो मुका ।
त्याचे भाळीं बुका, देवा नसो ॥१॥
नेणे अंतरीं जो, कृत्रिम कपटा ।
त्याचे माथां, जटा-भार नसो ॥२॥
तव गुणगान, जयाचे सुमुखीं ।
त्यापाशीं गोमुखी, देवा नसो ॥३॥
आनंदें तुला जो, आठवी कृपाळा ।
माळ त्याचे गळां, देवा नसो ॥४॥
परी तुझिये तो, सन्निध सज्जन ।
केलें जेणें मन, निर्मळ पैं ॥ ५ ॥

अभंग ११

जरी माझेपाशीं देवा असे धन ।
तरी मज जन, मान देई ॥ १ ॥

जैसा प्रेतावरी, धांवे तो वायस ।
त्यागितो तयास, संपतां तें ॥ २ ॥
मक्षिका गुंगते, जैशी गुळावरी ।
संपतां तो धरी अन्य मार्गा ॥ ३ ॥
तैसें हें जन बा, धनाचें सोयरें ।
भुलूनी येई रे धना माझ्या ॥ ४ ॥
धन गेलिया तें, पळे काकासमा ।
असे ऐसा क्रम जगीं देवा ॥ ५ ॥

अभंग १२.

जरी माझे गाठीं, असे द्रव्यराशी।
धरितें उराशीं, प्रेमें जन ॥ १ ॥
माझा माझा ऐसें, अवघे वदती ।
आक्रोशें रुदती, दुःखा माझे ॥ २ ॥
परी द्रव्य जातां, कोणी न जवळी ।
राहूनी कवळी, प्रेमें मातें ॥ ३ ॥
दीननाथ दीन,-बंधु सर्वसाक्षी ।
एक तूं मी लक्षीं विपत्काळीं ॥४ ॥

तूलाचि धरीं मी, कृपेचें तूं स्थान।
त्रिकाळीं समान सर्वांलागीं ॥ ५ ॥

अभंग १३.

शांतिसौख्य आहे अंतरीं जयाला।
धन द्रव्य त्याला काय होय ॥ १ ॥
काय होय त्याला सुख नाशवंत।
सखा भगवंत सौख्य ज्याचें ॥ २ ॥
सौख्य ज्याचें आहे विषयांचे ठायीं।
तोचि देवापायीं रत नोहे ॥ ३ ॥
रत त्याचे पायीं कैसा तो होईल।
मन जो वाहील अन्य देवां ॥ ४ ॥
अन्य देव नाहीं सत्य हेंचि जाणा।
जगताचा राणा तोचि एक ॥ ५ ॥

अभंग १४.

नोळखे कदा जो आपुलिया पित्या।
सार्थक तें जीत्या काय त्याचें ॥ १ ॥

काय त्याचें जगीं, अखिल तें जिणें ।
प्रभुवराविणें, शून्य जाणा ॥ १ ॥
शून्य जाणा साचि, त्यातें दशदीशा ।
नाणी जगदीशा, मनीं जो कां ॥२॥
प्रेमा जगदीशा-ठायीं आहे ज्याचा
तोचि संत साचा, जगामाजी ॥३ ॥
जगामाजी सत्य-शील जो तो साधु ।
येर सर्व भोंदु, कृत्रिमी ते ॥ ४ ॥

अभंग १५

नको मातें जप, न करीं मी तप ।
व्यर्थ खटाटोप, बाह्यात्कारी ॥ १॥
जगासी जो तारी, दुःखातें जो हारी ।
तया देवापरी, नमीं भावें ॥ २ ॥
नमीं त्या मीं भावें, साधूचे स्वभावें ।
तरी मज पावे, दीनबंधू ॥ ३ ॥
सखा भगवंत, अति कृपावंत ।
तयाचा न अंत, लागे कदा ॥ ४ ॥

माणसें हीं मूढ, परम तो गूढ ।
परि भावें दृढ, लाभतसे ॥ ५ ॥

अभंग १६.

मातापित्यां अन्ना, तळमळविशी ।
मेल्या पिंड देशी, कशासाठीं ॥१॥
पाणी पाणी जितां, वदतां शिणलीं ।
मेल्या तिलांजली, कशासाठीं ॥२॥
वस्त्रें फाटकींही, जित्या न त्यां देशी ।
मेल्या तीं, अर्पिशी, शेला कोणा ॥३॥
पिता वृद्ध तुझा, करपला उन्हांत ।
मेल्या तो, तें छत, कोणालागीं ॥४॥
असे ही मनुजा, दुःसह करणी ।
सुख रे स्मरणीं, नेदी मातें ॥ ५ ॥

अभंग १७.

जितीं मायबापें, आहेत जोंवरी ।
तोंवरी त्यांवरी, करीं प्रेमा ॥१॥

होईं त्यांच्या नित्य, सेवेशीं सादर ।
न तूं अनादर, करीं त्यांचा ॥ २ ॥
त्यांचिये हातूनीं, तूज विश्वंभरें ।
सर्व परिचें रे, सौख्य दिलें ॥ ३ ॥
पालन पोषण, बाळपणीं केलें ।
प्रेमें पाजियेलें, ज्ञानामृता ॥ ४ ॥
कंटाळावें ना त्वां, तयां वृद्धपणीं ।
तुझेसाठीं ज्यांणीं कष्ट केले ॥५॥

अभंग (दोन चरणी.)

अभग १.

प्रेमें गाऊं आह्मी वाचे ।
नाम मंगल तें साचें ॥ १ ॥
ठेवूं तूझे पायीं माथा ।
आळवूनी दीननाथा ॥ २ ॥
शुद्ध करूनीयां मन ।
भावें करूं तुझें ध्यान ॥ ३ ॥

ध्यान केल्या भेट होई ।
चित्त तेणें शांत राही ॥ ४ ॥
सुखा नाहीं मग पार ।
गेलिया तो जडभार ॥ ५ ॥

अभंग २.

प्रार्थी तूज जगन्नाथा ।
अव्हेरीं ना या अनाथा ॥ १ ॥
ठाव देई तूझे पायीं ।
न मी अन्य मागें कांहीं ॥ २ ॥
तुझे ठायीं पंचप्राण ।
नित्य होती रममाण ॥ ३ ॥
स्तवीं तूज शुभप्रदा ।
कृपा असो तुझी सदा ॥ ४ ॥
सज्जनांची वाट दावीं ।
तूजवरी भार ठेवीं ॥ ५ ॥

अभंग ३.

जगताचा तूं आधार ।
जगताचें तूंचि सार ॥ १ ॥
करिशी जगाची उत्पत्ति ।
त्याचि तूं करीशी स्थिती ॥ २ ॥
तूंचि जगाचें जीवन ।
तुझे ठायीं रंगो मन ॥ ३ ॥
तूंचि जगताचा स्वामी ।
शांति तूझे बा सुनामीं ॥ ४ ॥
तूंचि एक जगत्पाळ ।
पावें, स्तवितें तूझें बाळ ॥ ५ ॥

अभंग ४.

जेणें देवा आळविलें ।
तेणें तया मेळविलें ॥ १ ॥
जेणें विषयां जोडिलें ।
तेणें तयाला तोडिलें ॥ २ ॥

जेणें दीनां त्रास दिला ।
व्यर्थ देह त्या लाधला ॥ ३ ॥
जेणें सन्मार्ग त्यागिला ।
व्यर्थ जन्म त्याचा गेला ॥ ४ ॥
विश्वाधारा तुझ्या पायां ।
न बा धरिल्या सर्व वांयां ॥ ५ ॥

अभंग ५.

भावबळ नाहीं जया ।
देव कैंचा लाभे तया ॥ १ ॥
देव भावाचा भूकेला ।
ऐसें तुका बोलीयेला ॥ २ ॥
तरी भाव दृढ करा ।
चित्तीं वाहा शांताकारा ॥ ३ ॥
वाहियेल्या तेथ त्यातें ।
धांवेना तें अन्यायातें ॥ ४ ॥
दास ह्मणे भावें जन ।
करी पापाचें दहन ॥ ५ ॥

अभंग ६.

जेथें नाहीं कांहीं भाव ।
तेथें कैंचा राहे देव ॥ १ ॥
जेथें नांदे तीव्र काम ।
तेथें कैंचा आत्माराम ॥ २ ॥
जेथें वसेहो मत्सर ।
तेथें कैंचा विश्वेश्वर ॥ ३ ॥
जेथें पापीयांचें स्थान ।
तेथें कैंचा भगवान ॥ ४ ॥
जेथें क्रोध जाळी काय ।
तेथें कैंचा शांतिराय ॥ ५ ॥

अभंग ७.

देह आहे पापराशी ।
होय शुद्ध जातां काशी ॥ १ ॥
गंगेमाजी केल्या स्नान ।
होय देह पुण्यवान ॥ २ ॥

जाळियेल्या तांदुळ तुपा ।
होय देवाजीची कृपा ॥ ३ ॥
पिंड दिल्या गंगातीरीं ।
तिलोदक तयावरी ॥ ४ ॥
पूर्वजांतें होय मुक्ति ।
ऐशि अज्ञानांची उक्ति ॥ ५ ॥

अभंग ८.

देव दासाचे करवीं ।
सांगे युक्ती ही बरवी ॥ १ ॥
न तें गंगेचें सुजळ ।
करी अंतर निर्मळ ॥ २ ॥
देव आहे हो सर्वत्र ।
नको जायाला अन्यत्र ॥ ३ ॥
भेटे बसल्या तो ठायां ।
भावें आठवितां पायां ॥ ४ ॥
पिंड देतां मुक्ति न लाधे ।
ज्याचें कर्म त्यास बाधे ॥ ५ ॥

# भाग ७.

## आरती १.

जयदेव जयदेव
जय करुणागारा ।
धांवुनियां भक्तांच्या
येईं उद्धारा ॥ध्रु०॥
संसाराच्या पाशां
तोडुनियां भजतों ।
सुखदात्या तूझ्या
पदकमलीं रमतों ॥
अंतरीं तुझें गौरव मी करितों ।
विहित आनंदें बा
सौख्यें सेवीतों ॥ १ ॥ जय०
कविजन हे शिणले
गुण तूझे गातां ।
संत मुनिही थकले
पद तूझें ध्यातां ॥

पामर मी गाऊं
काय विभो आतां ।
दीन तुझ्या चरणीं
मी ठेवीं माथा ॥ २ ॥ जय०
संकटिं पडतां देवा
मजला तूं तारीं ।
ज्या तूं तारिसि त्याला
कोण कसा मारी ॥
तूं त्यागीसी मातें
तरि संकट भारी ।
तुज ऐसा तारक या
न दिसे संसारीं ॥३॥ जय०

आरती २.

जयदेव जयदेव
जय मंगलधामा ।
भावें भजतों तुजला
दे सौख्यारामा ॥ ध्रु० ॥

तव ध्यानें माझें
मन मोहित झालें ।
मनमोहन ह्मणुनी
नाम शोभलें ॥
भजनामृत प्रेमें
प्राशन केलें ।
करुणाकर देवा
सार्थक हें गमलें ॥ १ ॥ जय०

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

देवा केले तूवां
अगणित उपकार ।
सकल जगताचा
तूंची आधार ।
निजभक्तांचा घेशी
माथां तूं भार
ऐशी करुणा तूझी
देवा अपार ॥ २ ॥ जय०

अर्पीली काया
अवघी ही तूतें।
पातकि आहें परि तूं
उद्धरीं मातें।
शिशु हारीं पडतां
रक्षावें तातें।
सांभाळीं धरूनी
निजभक्ता हातें ॥ ३ ॥ जय०

आनंदाचा सतत
दिन ऐसा यावा
मग आह्मी प्रेमानें
करूं उत्सवा।
दयेनें तो तूवां
मान्य करावा
हीच प्रार्थना बा
तुजपाशीं देवा ॥ ४ ॥ जय०

## भुपाळी.

( "घनश्यामसुंदरा श्रीधरा अरूणोदय झाला—" या चालीवर. )

जगद्वंद्य केवला मंगला,
  स्तव म्यां आरंभिला ।
येइं झडकर करुणाकर, सेवक
  द्वारिं उभा ठेला ॥ ध्रु० ॥
प्रातःकाळीं बान्धवमिळुनी,
  कीर्ति तुझी गाऊं ।
देउनि आलिंगन प्रेमानें,
  पादकमल ध्याऊं ॥
अतिदुःसह भवपाश त्यांतुनी,
  आह्मि मुक्त होऊं ।
धुंडुनि अवघे सज्जनमेळे,
  संतसंग मिळवूं ॥
इहलोकीं सत्कार्य करावें,
  मनिं ऐसें वाहूं ।

शत्रुमित्र हे संकटिं पडतां,
उडी तेथ घेऊं ॥ १ ॥
जगद्वंद्य केवला० ॥
दर्शन द्यावें दीनजनोद्धर,
ममताळू देवा ।
भेट झालिया आनंदाचा,
अमित मिळे ठेवा ॥
सार्थक होई तरि देहाचें ,
सौख्य शांति जीवा ।
भेटीसाठीं बंधुमंडळी ,
भजूं धरुनि भावा ॥
अनन्यभावें शरण जाउनी,
आरंभिलि सेवा ।
येइं येइं बा पतितपावना,
करूं आज उत्सवा ॥ २ ॥
जगद्वंद्य केवला० ॥

महाराणीचे ज्येष्ठ पुत्र महाज्वरांतून मुक्त झाल्यावर ब्रिटिश राज्यांत ठिकाठिकाणीं ता० २७ माहे फेब्रुवारी सन १८७२ मंगळवार रोजीं आभारपूर्वक ईश्वरप्रार्थना झाल्या त्या प्रसंगीं प्रार्थनासमाजांत गाइलेलीं गीतें.

साक्या.

प्रजापालनीं तत्पर ऐशा,
गुणवंती राज्ञीला ॥
संकटसमयीं अभया दिधलें,
थोर तुझी हे लीला ।
नाहींरे पारावारा,
जगदीशा तव उपकारा ॥ १ ॥

भक्तरक्षका, संकटकालीं,
पालन अमुचें केलें ।
धांव घेतली म्हणुनी अवघें,
संकट विलया गेलें ।
नाहींरे पारावारा,
जगदीशा तव उपकारा ॥ २ ॥

आळविलें तुज दीनदयाळा,
सार्थक त्याचें झालें ।
दीनप्रार्थने भक्तांच्या त्वां,
करुणेनें ऐकीलें ।
नाहींरे पारावारा,
जगदीशा तव उपकारा ॥ ३ ॥

पद.

( " धांव विभो करुणाकर माधव "—या चालीवर. )

येइं प्रभो सुख—कारक तारक ।
पालक सकळां अखिल दुरितहर
॥ ध्रु० ॥

निर्वाणींचा प्राणसखा तूं
म्हणुनिशरणतुजहा तवकिंकर ॥१॥

ध्यान भजन हें जीवन याचें ।
इतर सकलही भासे नश्वर ॥ २ ॥

पडतां मजवरी संकट कांहीं ।
धांव लवकरी त्यांतुनि उद्धर ॥ ३ ॥

धरुनी हृदयीं तव पदकमलां ।
प्रेमें गुण मी गाइं निरंतर ॥ ४ ॥

देउनि मजला ठाव तव पदीं ।
मोक्षपदा ने हे करुणाकर ॥ ५ ॥

अभंग.

आणूनी त्वां जन्मा दिला हा आकार।
केले उपकार, देवराया ॥ १ ॥
वाढविला देह ममतेनें फार।
केले उपकार, देवराया ॥ २ ॥
गळां घालियेला, सद्भावाचा हार।
केले उपकार, देवराया ॥ ३ ॥
दुःखें टाळियेलीं, दयेनें त्वां थोर।
केले उपकार, देवराया ॥ ४ ॥
जाळियेला माझ्या, पापाचा तो भार।
केले उपकार, देवराया ॥ ५ ॥
केलें राजपुत्रा, शरीरिं सुस्थीर।
केले उपकार, देवराया ॥ ६ ॥
विपत्ती हरोनी, दिला आह्मां धीर।
केले उपकार, देवराया ॥ ७ ॥
दुर्लोभ तो तेणें, झाला असे दूर।
केले उपकार, देवराया ॥ ८ ॥

श्लोक. ( शार्दूलविक्रीडित. )

मांगल्या जनका पुराणपुरुषा,
विश्वाचिया हे नृपा
आह्मां आजि सुदीन हा उगवला,
ही त्वांच केली कृपा ।
घोरा तूजविणें हरील अमुच्या,
कोणी दिसेना असा
दुःखा टाळुनियां तुवांचि दिधला,
आनंद या मानसा ॥ १ ॥
देवा राजकुमार मुक्त करुनी,
क्लेशांतुनी काढिला
जाणों मृत्युमुखांतुनी भयहरा,
धांवोनियां वोढिला ।
आनंदें भरिली असे अखिल हे,
ऐशी प्रभो त्वां धरा
गावे त्वद्गुण पामरें कुठवरी,
म्यां केंवि सर्वेश्वरा ॥ २ ॥

धांवा, ('आहारे देवा,'–या चालीवर.)

जगदीशा केले अनंत उपकार ।
ह्मणोनी वांचे राज्ञीचा कुमार ॥धृ०

जयजयकारें तुझे रे गुण गाऊं ।
जयघोषें तूझ्या नामातें उच्चारूं ॥
करुणेनें तूझ्या विघ्नें तीं संहारूं ।
त्रिभुवननाथा भवभयातें वारूं ॥१॥

धाडीशी दुःखें खळांच्या शासना ।
न्यावया त्यांना सौख्याच्या आसना
धांवशी देवा भक्तांच्या पालना ।
ऐकें तरी ही दीनाची प्रार्थना ॥२॥

न येवो ऐसें आह्मांला संकट ।
दुःखाचा पंथ देवा हा बीकट ॥
संसारमार्गा क्रमूं दे त्या नीट ।
भक्तीचा तूझ्या कदा नसो वीट ॥३॥

दिंड्या.

जगामाजी प्रभु कीर्ति तुझी गाजे ।
दयाघन हें तुज नाम पूर्ण साजे ॥
भक्ति तूझी या अंतरीं विराजे ।
तुझा डंका या मुखीं नित्य वाजे ॥१॥
कष्ट होतां बहु राजकुमाराला ।
जगन्नयनीं बहु अश्रुपात झाला ॥
अखिल भूमंडळीं कहर महा आला ।
विश्व मारी प्रभु दीन हाक तूला ॥२॥
हाक ऐकोनी विभो धांवलाशी ।
राजपुत्रा त्वां धरियलें उराशीं ॥
धरोनी त्वां त्या दीधलें आह्मांशीं ।
असा देवा तूं पूर्णकृपाराशी ॥३॥
ह्मणुनि करितों मंगल नाम गान ।
सकल सौख्याचें एक तूं निधान ॥
तूंच आह्मांतें प्रभो पंचप्राण ।
तुझ्या प्रीतीचें होइ कधिं न मान ॥४॥

———

# भक्तिसुधा.

## कठिण शब्दांचा कोश.

### अ.

अखिल.—सर्व.

अगाध.—अपार, खोल.

अघ.—अपराध, पाप.

अघभार.—पापाचें ओझें.

अघहर.—पाप हरणकरणारा (देव).

अंतराय.—विघ्न.

अंतस्थ.—आंत राहिलेला.

अंतःस्थानीं.—अंतःकरणांत.

अतुल.—ज्याशीं दुसऱ्याची तुळणा करितां येत नाहीं तें.

अनन्यभावें.—एकभावें.

अनादि.—ज्याला जन्म नाहीं तो.

अनाद्यंत.—ज्याला आदि व अंत नाहींत तो.

अनिश.—नित्य, निरंतर.

अनुदिन.—प्रतिदिवशीं.

अन्यत्र.—दुसऱ्या ठिकाणीं.

अपेक्षा.—आशा, इच्छा.

अभिलाष.—लोभ, लालूच.

अमित.—अपार.

अमूर्त.—निराकार.

अरि.—शत्रु.

अवन.—रक्षण.

अव्हेरणें.—कंटाळा करणें.

अशाश्वत.—क्षणिक, क्षणभंगुर.

असार.—ज्यांत सार नाहीं तें.

अहर्निशीं.—रात्रंदिवस.

अळविणें.—दीनपणें मागणें.

### आ.

आत्माराम.--आत्म्याची शां-

ति ( देवाचें एक नांव ) जेणेंकरून आत्मा शांत होतो तो.
आद्यंत.—आदि अंत.
आधि.—मनाचें दुःख, व्यथा.
आनंदकंद.-आनंदाचा कांदा.
आसन्न.—जवळ.
आस्था.—काळजी, आशा.

इ.

इंद्रियग्राम.—इंद्रियसमुदाय.
इंदु.—चंद्र.

उ.

उत्सुकसा.—उत्कंठित असा.
उपाधि.—कारण.
उपेक्षणें.—अव्हेरकरणें, अनादरकरणें.

ऐ.

ऐहिक.—या मृत्युलोकासंबंधी.

क.

कदन.—युद्ध, मारण, हनन.
करुणार्णव.—दयासागर.
काक.—कावळा.
कानन.—रान, अरण्य.
कामशर.—काम किंवा मदन याचे बाण.
काय, काया.—देह.
कालत्रयीं.—भूत—वर्त्तमान—भविष्य कालीं.
काष्ठीं.—लांकडामध्यें.
कासया.—कां ?, कशाला ?
किंकर.—दास, सेवक.
केवल.—शुद्ध.
कैवल्यदाता.—मोक्षदाता.
क्रुद्ध.—क्रोधायमान.

ग.

गंधि.—सुवासिक.
गमणें.—वाटणें, दिसणें.
गान.—गायन.
गुज.—गुह्य.
गुणमंडित.—गुणांनीं सुशोभित.

च

चर्मनयनीं.—डोळ्यांनीं
चित्तोदधि.—चित्त हाच एक समुद्र.

चिन्मय.—ज्ञानसंपन्न.

छ.

छत.—छत्री.

ज.

जगदुद्धार.—जगाचा उद्धार करणार.

जगन्नयनीं.—जगांतील लोकांच्या डोळ्यांतून.

जनक.—बाप.

जनन.—जन्म.

जनित.—उत्पन्न झालेला.

जलधि.—समुद्र.

जाड्य.—बुद्धिमांद्य.

झ.

झणि.—सत्वर.

ठ.

ठेला.—राहिला.

त.

तच्छाया.—त्याची छाया.

तत्—जनित.— त्यापासून उत्पन्न झालेलें.

तदनु.—त्यानंतर, त्याप्रमाणें.

तर्पिली.—संतुष्ट केली.

तृषितालागीं.—तान्हेल्यास.

तोक.—पुत्र.

तोषवि.—आनंद देतो.

त्वत्.—तुझा, झी, झें.

द.

दयार्द्र.—दयावंत.

दारा.—बायको.

दिनकर.—सूर्य.

दिव्य.—सुंदर. तेजस्वी.

दुःखास्पद.—दुःखदेणारें.

दुरित.—पाप.

दुरन्त—वाईट आहे अंत ज्याच्या.

ध.

धरा.—पृथ्वी.

धी.—बुद्धि.

ध्याणें.—ध्यान करणें.

न.

नग.—पर्वत.

नश्वर.—नाश पावणारें.

निज.—आपलें.

निजसवें.—आपल्या बरोबर.

निधान.—ठेव, भांडार.

निर्वाणींचा.— संकटकाळचा.

निर्दालन.—नाश.

पापनगारी.—पापरूपी पर्वताचा शत्रु (देव).

पाद.—पद, पाय.

पादाब्ज. } पाय हेंच कोणी कमल.
पादांवुज. }

पारावारा.—मर्यादा.

पैं.—

**ब.**

बाह्याभ्यंतरीं.—आंत व बाहेर.

बुध.—ज्ञानी, विद्वान्.

**भ.**

भक्तिरसामृत; भक्तिसुधा.—भक्ति हेंच कोणी अमृत.

भजनामृत.—भजन हेंच कोणी अमृत,

भयहर.—भय हरण करणारा.

भव.—संसार.

भवभयभंग.—संसारांतील भयांचा नाश.

भाजा.—बायको.

भानु.—सूर्य.

भेला.—पेला, भांडें.

**म.**

मंगला. } हे मंगलरूपी देवा.
मांगल्या. }

मंगलधाम.—सर्व मांगल्याचें घर.

मत्.—माझें.

मद.—गर्व.

मदनशरतापें.— कामाच्या बाणाच्या तापानें.

मही.—पृथ्वी.

मान.—माप.

मानसपूजन.— मनांतल्या मनांतच पूजन करणें.

मालिन्य.—मळीणपणा.

**य.**

यातनाहर.—दुःख हरण करणारा.

याचितों.—मागतों.

**र.**

रजनी.—रात्र.

रसना.—(१) जीभ. (२) चव; गोडी.

रिझवूं.—संतोषवूं.

रंक.—भिकारी.

ल.

लाधली.—मिळाली.

लेणें.—पांघरणें.

व.

वत्सल.—दयाळू.

वंदन.—नमन.

वसन.—वस्त्र.

वा.—अथवा.

वांछित.—इच्छित.

वात्सल्य.—दयाळूपणा.

वानणें.—वर्णन करणें.

वायस.—कावळा.

वांयां.—व्यर्थ.

वारणें.—दूर करणें.

विकल.—कलारहित, नाश पावलेली.

विघ्नविभंजन.—विघ्नाचा नाश करणारा.

विनटून.—प्रयत्न करून.

विनति.—विनंती, प्रार्थना.

विनम्र.—अतिनम्र.

विनयपुष्प.— विनय हेंच कोणी फूल.

विभु; विभो.—हे प्रभो.

विमल.—शुद्ध, स्वच्छ.

विरह.—वियोग.

विलय.—शेवट, नाश.

विलोकणें.—पाहणें.

विविध.—नानाप्रकारच्या.

विवेक.—विचार.

विश्वाधार.—जगाचा आधार.

विषय.—ऐहिकवस्तु, पदार्थ.

विषयासक्त.—ऐहिकवस्तूंची इच्छा धरणारा.

विस्मृति.—विसर.

विहित.—योग्य, उचित.

व्यवसाय.—व्यापार.

व्यासादि.—व्यास आदिकरून जे ऋषी होऊन गेले ते.

श.

शमणें.—शांत होणें.

शरणागत.—शरण आलेला.

शांतिराय.—शांतीचा राजा.

शास्ता.—शासन करणारा.

शाश्वत.—चिरकाल राहणारें.

शाश्वतसुखदा.— हे चिरकाल सुख देणाऱ्या(देवा).

शिरसा.—अतिलीनतेनें.

शिशु.—लेंकरूं.

शुभप्रद.—मंगलदाता.

**ष.**

षडरि; षड्रिपु.—काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सहा शत्रु.

**स.**

सच्चिदानंद.—ज्यास नाश नाहीं,—ज्यास पूर्ण ज्ञान व नित्य सुख असा परमेश्वर.

सत्.—चांगलें.

संतत, सदैव,—नेहमी,—नित्य.

सदन.—घर.

सदय.—दयाळु.

सनातन.—ज्याला जन्ममरण नाहीं तो.

सप्राण.—जीवलावून.

सप्रेम.—प्रेमानें.

सरणी.—प्रकार.

सरिता.—नदी.

सर्वगामी.—सर्वठायीं गमन करणारा.

संसर्ग.—संग.

सादर.—तत्पर.

सिंधुसदन.—समुद्र हेंच कोणी घर.

सुखकंद.—सुखाचा कांदा.

सुखसद्म.—सुखाचें घर.

सुखस्यंदन.—सुखाचा रथ.

सुधाबिंदु—अमृताचा थेंब.

सुधाम.—चांगलें घर.

सुपुष्पसुविलेपनीं.— चांगल्या पुष्पांनीं किंवा गंधानें.

सुमन.—(१) चांगलें मन, (२) पुष्प.

सेवावी.—ग्रहण करावी.

सौख्य.—सुख देणारा.

**ह.**

हृद.—हृदय.

हृदयसुमन.—हृदय हेंच कोणी पुष्प.

हनन.—नाश, हत्या.

हारणें.—हरणें.

## विक्रीचीं पुस्तकें.

१ भक्तिसुधा . . . . . . . . . . . . . . . किंमत ९ आणे.

२ ब्राह्मधर्म प्रतिपादक वाक्यसंग्रह . . . „ ८ आणे.

कें इंदुप्रकाश छापखाना